**परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांची युनायटेड किंग्डमला भेट (4-9 मार्च 2025)**

09 मार्च 2025

यूके परराष्ट्र सचिव डेव्हिड लॅमी यांच्या निमंत्रणावरुन परराष्ट्र व्यवहार मंत्री (EAM) डॉ. एस. जयशंकर यांनी 4-9 मार्च 2025 (या कालावधी दरम्यान त्यांनी 6-7 मार्च 2025 रोजी आयर्लंडला भेट दिली) दरम्यान युनायटेड किंग्डमच्या औपचारिक भेटीवर होते. परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी यूकेचे पंतप्रधान सर कीर स्टार्मर आणि उप-पंतप्रधान अँजेला रेनेर यांची भेट घेतली. त्यांनी आपले समपदस्थ परराष्ट्र सचिव डेव्हिड लॅमी यांच्या सोबत विस्ताराने चर्चा केली. जॉन्थन रेनॉल्ड्स ( व्यापार आणि उद्योग मंत्री) आणि यवेट कूपर (गृह सचिव) यांची देखील भेट घेतली. या भेटीदरम्यान परराष्ट्र मंत्र्यांनी सरकार, उद्योग , अभ्यासक आणि परदेशस्थ भारतीय यांच्या प्रतिनिधींच्या सोबत चर्चा केली.

2. पंतप्रधान स्टार्मर यांच्या सोबतच्या भेटीदरम्यान पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या सदिच्छा परराष्ट्र मंत्र्यांनी कळविल्या. दोन्ही नेत्यांनी भारत-यूके संबंधांमध्ये, विशेषतः मुक्त व्यापार करार (FTA) विषयक वाटाघाटी पुन्हा सुरू करण्यासह सकारात्मक दर्शविली. त्यांनी तंत्रज्ञान सहकार्य बळकट करणे आणि नागरिक परस्पर संबंध घनिष्ठ करण्याचे महत्व अधोरेखित केले. यूक्रेन विवाद सह महत्वाच्या जागतिक मुद्द्यांवर चर्चा केली.

3. परराष्ट्र सचिव लॅमी यांनी परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांचे चेवनिंग हाऊस येथे स्वागत केले. परराष्ट्र व्यवहार मंत्री आणि परराष्ट्र सचिवांनी धोरणात्मक समन्वय, राजकीय सहकार्य, व्यापार वाटाघाटी, शिक्षण, तंत्रज्ञान, गतिशीलता आणि नागरिक परस्पर आदान-प्रदान यासह भारत-यूके संबंधांचा विस्ताराने आढावा घेतला. त्यांनी उभय बाजूंनी चर्चा केलेल्या नवीन रोडमॅप 2.0 विषयक प्रगतीचा आढावा घेतला. ज्यामुळे सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी नवीन ऊर्जा आणि गती मिळेल. त्यांनी युक्रेन संघर्ष, पश्चिम आशिया, बांगलादेश आणि राष्ट्रकुल यासह प्रादेशिक आणि जागतिक घडामोडी विषयक विचारांचे आदान-प्रदान केले. उभय नेत्यांनी भारतातील चेवनिंग स्कॉलर्स सोबत संवाद साधला. द्विपक्षीय संबंध दृढ करण्यासाठी शिक्षण आणि युवकांची महत्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली.

4. भारत-यूके FTA वाटाघाटींच्या प्रगतीवर व्यवसाय आणि व्यापार सचिव यांसोबतच्या परराष्ट्रमंत्र्यांच्या बैठकीत लक्ष केंद्रित करण्यात आले. व्यापार आणि गुंतवणुकीच्या संधी विस्तारासाठी, व्यापार अडथळे कमी करण्यासाठी आणि बाजारपेठेत प्रवेश वाढविण्यावर भर देण्यासाठी उभय बाजूंनी एकमेकांच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. गृह सचिव यांसोबतच्या बैठकीत परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी प्रतिभा गतिशीलता, नागरिक परस्पर आदानप्रदान आणि तस्करी आणि कट्टरतावादाला प्रतिरोध करण्यासाठी संयुक्त प्रयत्नांवर द्विपक्षीय सहकार्य मजबूत करण्यावर चर्चा केली. परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी आपले मिशन/पोस्ट आणि राजदूतांच्या सुरक्षिततेचा मुद्दा उपस्थित केला आणि HCI लंडन परिसरात झालेल्या

हल्ल्याचा जलदगतीने छडा लावण्याच्या मागणीचा पुनरुच्चार केला. PKE घटकांच्या वाढत्या भारतविरोधी कारवायांच्या बाबत वाढत्या चिंतेकडे लक्ष देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

5. परराष्ट्र व्यवहार मंत्री चॅथम हाऊस येथील चर्चेत सहभागी झाले. चॅथम हाऊसचे संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी ब्रॉनवेन मॅडॉक्स यांच्या सोबतच्या संवादात त्यांनी बदलती भूराजनीती, भू-अर्थशास्त्र, भारत-यूके संबंध आणि जागतिक घडामोडींवरील भारताचा दृष्टिकोन यावर भाष्य केले.

6. उत्तर आयर्लंड स्थित बेलफास्ट येथील भारतीय वाणिज्य दूतावासाचे उद्‌घाटन परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी केले. याप्रसंगी एडविन पूट्स (स्पीकर, नॉर्थन आयर्लंड असेंब्ली) ; फ्लेअर अँडरसन (मंत्री); मिकी मरे (बेलफास्टचे लॉर्ड मेयर, कौन्सिलर); आणि लॉर्ड दिलजीत राणा (भारताचे मानद वाणिज्य दूत ) यांच्यासह अनेक प्रतिष्ठित स्थानिक मान्यवर उपस्थित होते. वाणिज्य दूतावासाचे उद्‌घाटन हे उत्तर आयर्लंडमध्ये भारताची उपस्थिती मजबूत करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे. ज्यामुळे व्यापार, व्यवसाय, तंत्रज्ञान आणि शैक्षणिक संबंध निश्चितपणे विस्तारतील.

7. परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी स्टॉर्मोंट कॅसल येथे उत्तर आयर्लंडच्या उप-प्रथम मंत्री एम्मा लिटिल-पेंगेली आणि कनिष्ठ मंत्री आयस्लिंग रेली यांचीही भेट घेतली. त्यांनी कौशल्य विकास, सायबर सुरक्षा, तंत्रज्ञान, सर्जनशील उद्योग आणि उत्पादन यासारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये सखोल सहकार्याच्या संधींचा शोध घेतला.

8. परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी बेलफास्ट स्थित क्वीन्स विद्यापीठाला भेट दिली. जिथे त्यांनी उच्च शिक्षण क्षेत्रात भारत-यूके भागीदारी विस्ताराचे मूर्त रुप म्हणून गिफ्ट सिटी, गुजरातमध्ये त्यांच्या आगामी संकुलाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सध्या क्वीन्स विद्यापीठात शिक्षण घेत असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. त्यांचे अनुभव आणि आकांक्षा बाबतची मते जाणून घेतले.

9. परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी मँचेस्टर मध्ये भारतीय वाणिज्य दूतावासाचे उद्‌घाटन केले. यूके मधील हा चौथा भारतीय वाणिज्य दूतावास असेल. ज्यामुळे परदेशस्थ भारतीयांची अनेक वर्षांची मागणी प्रत्यक्षात आली आहे आणि उत्तर इंग्लंड मध्ये भारताच्या राजनैतिक संबंधाला बळकटी मिळाली आहे. या समारंभाला उप-पंतप्रधान अँजेला रेनेर, इंडो-पॅसिफिकसाठी FCDO मंत्री कॅथरीन वेस्ट, ग्रेटर मँचेस्टरचे उप-महापौर पॉल डेनेट आणि स्टॉकपोर्टचे खासदार नवेंदु मिश्रा उपस्थित होते. नवीन वाणिज्य दूतावास व्यापार, सांस्कृतिक देवाणघेवाण, नागरिक परस्पर संबंध, क्रीडा क्षेत्रासह इतर क्षेत्रांमध्ये वाढ करण्यास मदत करेल याबद्दल मोठा उत्साह होता. उप-पंतप्रधानांसोबत झालेल्या बैठकीदरम्यान परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी मँचेस्टर मध्ये वाणिज्य दूतावास स्थापनेसाठी केलेल्या सहकार्याबाबत आभार व्यक्त केले. परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी ओल्ड ट्रॅफर्ड येथे भारतीय समुदायाचे प्रतिनिधी आणि उद्योग धुरिणांसोबत देखील चर्चा केली.

10. या भेटीमुळे भारत आणि युनायटेड किंग्डम मधील मजबूत संबंधांना पुन्हा बळकटी मिळाली. ज्यामुळे भारत-यूके सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीला नवी गती मिळाली. यामुळे बदलत्या जागतिक परिस्थितीत राजकीय, आर्थिक आणि नागरिक परस्पर सहकार्य मजबूत करण्यासाठी दोन्ही राष्ट्रांच्या वचनबद्धतेला बळकटी मिळाली.

लंडन

09 मार्च 2025